मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# चांगला शोमरोनी



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus

रूपान्तरकार: Ruth Klassen; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


"गुरुजी ! सार्वकालिक जीवन
मिळविण्यासाठी मी काय केले
पाहिजे?" ज्या मनुष्याने हा
असा प्रश्न विचारला
होता तो
शास्त्री
होता, येशूची परिक्षा
पाहण्याचा प्रयत्न करित होता.


येशूने त्याला म्हटले, "देवाच्या
नियमशास्त्रात काल सांगितले
आहे?" तो मनुष्य म्हणाला,
"देवावर आणि
शेजाऱ्यांवर
प्रीति
कर." "परंतु माझा
शेजारी कोण असा प्रतिप्रश्न त्याने केला."

त्या मनुष्याच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, येशूने एका माणसाची गोष्ट सांगितली, एक मनुष्य यरुशलेमेहून यरीहोस रस्त्याने जात होता.

या मनुष्यावर चोरांनी हल्ला केला.




त्याच्याजवळ जे काही मिळेल ते सर्व त्या चोरांनी
चोरले, त्या अभागी प्रवाशाचे कपडे देखिल
त्यांनी चोरुन नेले. त्यांनी त्याला
फार जखमी
देखिल केले होते,
आणि रस्त्याच्या कडेला
अर्धमेला अवस्थेत टाकून ते निघून गेले.


योगायोगाने एक याजक त्याच वाटेने
आला. त्या जखमी मनुष्याला
तो निश्चितच
मदत करेल.
नाही ! त्या
रक्तबंबाळ मनुष्याला जेंव्हा त्याने
पाहिले, तेव्हा तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने निघून गेला.


लवकरच चालणाऱ्या पायांच्या आवाजाने कोणीतरी
दुसरा मनुष्य येत असल्याची चाहुल लागली. हा
मनुष्य मंदिरात याजकाला मदत
करणारा लेवी होता.


त्याने त्या जखमी अवस्थेतील मनुष्याला पाहिले
आणि मग तो त्याला मदत न करताच
निघून गेला.

अखेरिस, त्याच वाटेने शोमरोनी मनुष्य आला. यहुदी लोक शोमरोनी लोकांचा व्द्ेष करित.




शोमरोनी मनुष्य; गोष्टीतील नायक आहे याची, येशूची गोष्ट ऐकणाऱ्या लोकांनी अपेक्षा देखिल केली नसावी. परंतु तो होता. शोमरोनी मनुष्य त्या
जखमी
मनुष्याला
मदत करण्यासाठी तेथे थांबला.

शोमरोनी मनुष्य खाली वाकला, आणि हळूवारपणे त्याने अनोळखी मनुष्याच्या जखमांवर औषध लावून पट्टी बांधली. आणि मग त्याने त्या जखमी मनुष्याला त्याच्या



स्वतःच्या गाढवावर बसण्यासाठी मदत केली.


वाटेतील एका उतारशाळेत,
शोमरोनी मनुष्याने त्या जखमी
मनुष्याची रात्रभर
काळजी घेतली.


सकाळ झाल्यावर, तो प्रवास करणारा
मनुष्य बरा होईल तोपर्यंत त्याची काळजी
घेण्यास लागणारा खर्च
शोमरोनी मनुष्याने
त्या उतारशाळेच्या
मालकाला दिला.

गोष्ट येथे संपली. आणि येशूने विचारले, "या जखमी झालेल्या मनुष्याचा शेजारी कोण?"







त्या शास्त्रीने उत्तर दिले,
"ज्या शोमरोनी मनुष्याने
त्याच्यावर दया केली, तो
त्याचा शेजारी होय."


येशू त्याला म्हणाला, "जा आणि तूंहि तसेच कर."
कोणताही गरजवंत हा आमचा शेजारी
आहे. गरजवंत लोकांना
मदत करण्याच्याव्द्ारे
आम्ही आमची प्रीति
दाखवू शकतो.
आणि असे करणे
देवाला
आवडते.

चांगला शोमरोनी

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

लूक १०

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16